शासकीय जमीनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर कब्जेहक्काच्या किंमतीवर आकारावयाच्या व्याजाच्या दराबाबत व भाडेपट्टयाने द्यावयाच्या जमिनीच्या वार्षिक भाडेपट्टयाच्या दरानुषंगाने स्टेट बँक ऑफ इंडिया चा "पी.एल.आर. (एसबीएआर/बेस रेट) " दराबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः पीएलआर-०१/२०१४/प्र.क्र.१२/ज-१**

जागतिक व्यापार केंद्र, सेंटर वन इमारत,
३२ वा मजला, कफ परेड, मुंबई-४०० ००५
दिनांक :- ३० जानेवारी, २०१४

वाचा :-

१) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. जमीन-१०९२/प्र.क्र.८४/ज-१, दिनांक -३०.६.१९९२
२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. जमीन १०९७/२२१४/प्र.क्र.९३/ज-१, दिनांक-८.७.१९९९
३) उप महाव्यवस्थापक, भारतीय स्टेट बँक, स्टेट बँक भवन, मुंबई यांचे पत्र. दिनांक-१७.१.२०१४

प्रस्तावना:-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता - १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम- १९७१ मधील तरतूदीनुसार शासकिय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर, अशा जमिनींच्या कब्जेहक्काच्या रकमेवर त्या जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यापासून ते अंतिम कब्जेहक्काची किंमत निश्चित करुन तिचा भरणा करण्याच्या दिनांकापर्यंत १५ % दराने व्याज आकारावे. तसेच, शासकिय जमिनीच्या भूईभाड्याचा दर संपूर्ण बाजारमुल्याच्या १५ % आकारण्याचा निर्णय उक्त शासन निर्णय दि. ३०.६.१९९२ अन्वये घेण्यात आलेला आहे. याबाबत शासनाकडून पुनर्विचार करुन उक्त व्याजाच्या व भूईभाड्याच्या दरामध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय दि. ८.०७.१९९९ अन्वये पुढीलप्रमाणे सुधारित आदेश दिलेले आहेत. आगाऊ ताबा दिलेल्या शासकिय जमिनीच्या अंतिम किंमतीवर तथा तात्पुरती किंमत व अंतिम किंमत यातील थकीत रकमेवर आकारावयाच्या व्याजाचा दर आणि भूईभाड्याने दिलेल्या शासकीय जमिनीच्या वार्षिक भूईभाड्याचा दर भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" इतका असावा. हा दर दरवर्षी दि. ०१ जानेवारीच्या भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" च्या दराइतका असावा आणि तो त्या संपूर्ण वर्षाकरिता कायम असावा. भारतीय स्टेट बँकेचा "प्राईम लेंडींग रेट" मध्येच बदलला, तरी पूर्वीचाच दर त्या संपूर्ण वर्षाकरिता कायम असेल व वर्ष संपल्यानंतर आवश्यक असल्यास पुन्हा सुधारण्यात यावा. त्यानुषंगाने, सन १९९९ पासुन दरवर्षी दि. ०१ जानेवारीच्या भारतीय



सहसंचालक नगर रचना (मु.) पुणे.

स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" चा दर संपूर्ण वर्षाकरिता या प्रयोजनार्थ वेळोवेळी प्रत्येक वर्षी घोषीत करण्यात आला आहे. व्याज दरांच्या आकारणीकरीता एकत्रीत दरवर्षीचे दर प्राप्त होण्याच्या उद्देशाने सुलभ संदर्भाकरिता वेळोवेळी घोषित केलेल्या "प्राईम लेंडींग रेट" च्या दरांचा एकत्रित संकलित आदेश देखील शासन निर्णय दिनांक २६.११.२०१२ अन्वये निर्गमित केला आहे. सबब, सन २०१४ या संपुर्ण वर्षासाठी आकारावयाच्या उक्त नमूद व्याजाचा दर आणि भूईभाड्याचा दर निश्चित करण्यासाठी भारतीय स्टेट बँकेकडून दि. ०१ जानेवारी २०१४ चा "पी.एल.आर. (एसबीएआर/बेस रेट)" चा दर संदर्भाधिन क्र.३ येथील पत्रान्वये प्राप्त करुन घेण्यात आला आहे. सदर "पी.एल.आर. (एसबीएआर/बेस रेट)" चा दर क्षेत्रीय यंत्रणांना विषयाधिन प्रयोजनार्थ उक्त पार्श्वभुमीवर कळविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन परिपत्रक -

शासकिय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर कब्जेहक्काच्या रकमेवर आकारावयाच्या व्याजाचा दर तथा भाडेपट्ट्याने द्यावयाच्या जमिनीकरीता आकारावयाच्या वार्षिक भुईभाड्याचा दर हा प्रत्येक वर्षाच्या १ जानेवारी रोजी असलेल्या भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" इतका असावा आणि तो त्या संपूर्ण वर्षाकरिता कायम ठेवावा असे संदर्भाधिन शासन निर्णयान्वये आदेशित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने भारतीय स्टेट बँकेकडून दि. ०१ जानेवारी २०१४ रोजीचा " पी.एल.आर. (एसबीएआर/बेस रेट) " संदर्भाधिन क्र.३ येथील पत्रान्वये प्राप्त करुन घेण्यात आला असुन, त्यांनी सदर रोजीचा " पी.एल.आर.(एसबीएआर/ बेस रेट)" १०.००% " असल्याचे कळविले आहे.

सबब, सन २०१४ या संपुर्ण वर्षासाठी, शासकिय जमिन कब्जेहक्काच्या रकमेवर आकारावयाच्या व्याजाचा दर तथा भुईभाड्याचा दर भारतीय स्टेट बँकेच्या उक्त "पी.एल.आर. (एसबीएआर/बेस रेट) " च्या दरानुसार आकारण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१३०१५३७२८९७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सुनिल कोठेकर
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.



एच-२३६३[ए] -१अ

५. सर्व विभागीय आयुक्त.
६. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१) मुंबई.
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर.
१०. सर्व जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी/ तहसिलदार.
११. वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
१२. सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
१३. सर्व सहसचिव / उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. सर्व अवर सचिव /कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग,जागतिक व्यापार केंद्र,कफ परेड, मुंबई-०५.
१५. कक्ष अधिकारी (ल-१), संगणक शाखा,महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
१६. निवडनस्ती ( ज-१) , महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

--------



एच-२३६३[ए] -२०